# इचलकरंजी महानगरपालिका,इचलकरंजी.

## कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक (City Co-ordinator) पद भरतीकरिता जाहीर सूचना (२)

मा.राज्य अभियान संचालक, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचेकडील क्र. राअस/शहर समन्वयक /२१४/२३-२४, दिनांक २३/०२/२०२४ चे पत्रान्वये म.न.पा. करिता कंत्राटी तत्वावरील **शहर समन्वयक (City Co-ordinator) (०२ जागा)** पद भरतीची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर करणेस विहित अटीस अधीन राहून मान्यता देण्यात आलेली आहे.त्यानुसार खालील अर्हता धारण करणा-या इच्छुक उमेदवारांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. मान्यता प्राप्त विद्यापीठाची खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी :
(१) बी. ई/बी. टेक. (कोणतीही शाखा), (२) बी. आर्क, (३) बी. प्लॅनिंग, (४) बी.एस.सी. (कोणतीही शाखा)

२. अनुभव : नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेशी निगडीत कामाचा किमान सहा महिन्याचा अनुभव आवश्यक.

३. वयोमर्यादा : कमाल वयोमर्यादा ३५ वर्ष (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभवा इतकी वयोमर्यादा शिथील करण्यात येईल).

तरी इच्छुकांनी त्यांचे अर्ज (संपर्क क्रमांक व ई मेल ॲड्रेस नमूद केलेले) शैक्षणिक व अनुभवविषयक कागदपत्रांसह दिनांक ०९.०९.२०२५ पूर्वी इचलकरंजी महानगरपालिकेच्या आवक-जावक (बारनिशी) विभागात सादर करावेत.अर्ज व अर्हताविषयक अभिलेखांचे पडताळणीअंती पात्र उमेदवारांना मुलाखतीस बोलाविण्यात येईल. नियुक्ती प्रक्रिया महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचेकडील दिनांक २३/०२/२०२४ चे पत्रासोबतचे प्रपत्रानुसार राबविण्यात येईल.

विहित मुदतीनंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.यासंबंधी अधिक माहिती व सविस्तर जाहिरात म.न.पा.चे आस्थापना व सामान्य प्रशासन विभागाकडे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळेत तसेच म.न.पा.चे ichalkaranjimnp.in या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

Digitally signed by
Rahul Sarjerao Mardhekar
Date: 01-09-2025
16:17:38

(राहुल मर्ढेकर)
उपायुक्त,
इचलकरंजी महानगरपालिका.

जा.क्र.आस्था.व सा.प्र.वि./कावि ०१/ ८७६ /२०२५,
दिनांक ०१.०९.२०२५

प्रति,
1) संगणक विभागप्रमुख,
1- म.न.पा. संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी

2) नाईक एवाळकर
1- म.न.पा. नोटिस बोर्डवर प्रसिद्धीसाठी

1/9/25
प्रभारी सहायक आयुक्त
आस्थापना व सामान्य प्रशासन विभाग
इचलकरंजी महानगरपालिका